# ८. पकिण्णानि सुभासितानि

**प्रस्तावना**

'सुभासितानि' म्हणजे एखादे महत्वपूर्ण, अर्थपूर्ण वचन मर्यादित शब्दात व्यक्त करणे. सम्यक विचार व्यक्त करण्याचे सामर्थ्य या सुभासितांमध्ये आहे. संपूर्ण पालि साहित्य या सुभासितांनी समृद्ध आहे. तिपिटकातील अनेक ग्रंथात विशेषता धम्मपद, सुत्तनिपात इत्यादी ग्रंथात अशी सुभासिते विपुल प्रमाणात आहेत. वेगवेगळ्या ठिकाणी ते विखुरलेले आहेत, वेगवेगळ्या प्रसंगी तथागतांनी नैतिकतेवर आधारीत जे उपदेश सांगितलेले आहेत, त्या सर्व उपदेशांचे संकलन म्हणजे धम्मपद, सुत्तनिपात इत्यादी मधील सुभासिते होत.

प्रस्तुत सुभासित हे धम्मपदामधील काही गाथांचा संग्रह आहे. या सुभासितांमधून जीवनाला सुसंपन्न बनविणारे धम्मवचन पालि गाथांच्या माध्यमातून अतिशय चांगल्याप्रकारे सांगितल्या गेले आहेत. नैतिक आचरणाच्या दृष्टीने, सर्वांगिण विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने तसेच सत्य धम्माचे पालन करण्याच्या दृष्टीने या सुभासितांमधील गाथा प्रेरक आहेत.



१) अप्पमादो अमतपदं, पमादो मच्चुनोपदं।
अप्पमत्ता न मीयन्ति, ये पमत्ता यथा मता ।। (अप्पमादो वग्गो, गाथा क्र. ०१)

२) मनोपुब्बङ्गमा धम्मा, मनोसेट्ठा मनोमया,
मनसा चे पदुट्ठेन, भासति वा करोति वा।
ततो नं दुक्खमन्वेति, चक्कं व वहतो पदं ।। (यमक वग्गो, गाथा क्रं. ०१)

३) मनोपुब्बङ्गमा धम्मा, मनोसेट्ठा मनोमया,
मनसा च पसन्नेन, भासति वा करोति वा,
ततो नं सुखमन्वेति, छाया व अनपायिनि ।। (यमक वग्गो, गाथा क्रं ०२)

४) फन्दनं चपलं चित्तं, दुरक्खं दुन्निवारयं ।
उजु करोति मेधावी, उसुकारो' व तेजनं ।। (चित्तवग्गो, गाथा क्रं ११)

५) चन्दनं तगरं वापि, उप्पलं अथ वस्सिको।
एतेसं गन्धजातानं, सीलगन्धो अनुत्तरो ।। (पुप्फवग्गो, गाथा क्रं १२)

६) पुत्ता मत्थि धनं मत्थि, इति बालो विहञ्ञति
अत्ता हि अत्तनो नत्थि, कुतो पुत्तो कुतो धनं ।। (बालवग्गो, गाथा क्र. ०३)

७) न भजे पापके मित्ते, न भजे पुरिसाधमे ।
भजेथ मित्ते कल्याणे, भजेथ पुरिसुत्तमे ।। (पण्डितवग्गो, गाथा क्रं ०३)

८) सब्बे तसन्ति दण्डस्स, सब्बे भायन्ति मच्चुनो।
अत्तानं उपमं कत्वा, न हनेय्य न घातये ।। (दण्डवग्गो, गाथा क्रं. ०१)

९) अत्ताहि अत्तनो नाथो, को हि नाथो परो सिया।
अत्तना हि सुदन्तेन नाथं, लभति दुल्लभं।। (अत्तवग्गो गाथा, क्र. ०४)

१०) नत्थि रागसमो अग्गि, नत्थि दोससमो गहो ।
नत्थि मोहसमं जालं, नत्थि तण्हासमा नदि ।। (मलवग्गो, गाथा क्रं १७)

११) सब्बपापस्स अकरणं, कुसलस्स उपसम्पदा।
सचित्त परियोदपणं, एतं बुद्धानसासनं।। (बुद्धवग्गो, गाथा क्रं. ०५)

१२) आरोग्य परमा लाभा, सन्तुट्ठि परमं धनं।
विस्सास परमा ञाति, निब्बाणं परमं सुखं।। (सुखवग्गो, गाथा क्रं ०८)

१३) अक्कोधेन जिने कोधं, असाधु साधुना जिने ।
जिने कदरियं दानेन, सच्चेनालिकवादिनं ।। (कोधवग्गो, गाथा क्रं. ०३)

**(निवडक धम्मपद)**

## शब्दार्थ

**अप्पमाद (वि.) –** अप्रमाद, जागरूकता

**पमादो (नपु.) –** प्रमाद

**न मीयन्ति (वर्त. क्रि.) –** मरत नाहीत

**मनो (मन. प. वि.ए.व.) –** मन

**पदुट्ठेन (कृ.)–** प्रदर्शित वचनाने

**सुखमन्वेति (क्रि.) –** सुख सोबत करते.

**फन्दनं (नपु.) –** क्षणिक, स्पंदन

**दुरक्ख (वि.) –** रक्षण करण्यास कठिण

**उजु (क्रि. वि.) –** सरळ

**ञातक (पु.) –** नातलग, आप्तेष्ट

**चन्दनं (पु.) –** चंदन

**सीलगन्धो (पु.) –** शीलांचा सुगंध, शीलगंध

**न भजे (क्रि.) –** संगती करू नये.

**वस्स (पु. नपु.) –** वर्ष

**असमाहितो –** एकाग्रचित्तरहित

**जीवितं (नपु.) –** जीवन

**सीलवन्तस्स (छ. वि. ए. ठ. ) –** शीलवानाचे

**तसन्ति (वर्त. क्रि. प. पु. अ.व.) –** भितात

**सब्ब पापस्स –** कोणत्याही प्रकारचे पाप

**कुसलस्स (छ. वि.) –** कुसलाचा, पुण्याचा संचय करणे

**परियोदपणं (क्रि.)–** परिशुद्ध करणे

**पुरिसा (पु.) –** पुरुष

**राग (पु.) –** आसक्ती

**तपो (पु. नपु.) –** तप करणे

**सन्तुट्ठि (स्त्री.) –** संतुष्टी, संतोष, समाधान

**अमतपदं (नपु.) –** अमृतपद, अमरपद

**मच्चुनो (पु.) –** मृत्यू, मरण

**यथामता(क्रि.) –** मृतवत, मेल्यासारखे

**सेट्ठा (वि.) –** श्रेष्ठ, महान

**भासति वा करोति वा (वर्त.क्रि.ए.व.)–**बोलतो किंवा (काम) करतो.

**चपलं (वि.) –** चंचल

**दुन्निवारयं (वि.) –** थांबवून ठेवणे

**करोति (वर्त. क्रि.) –** करतो

**सेय्यसो –** अधिक हित, चांगले

**वापि (स्त्री.) –** कमळ, पुस्करणी

**अनुत्तरो (नपु. वि.) –** अनुत्तर, सर्वोत्तम

**पुरिसुत्तमे (पु.) –** पुरुषात उत्तम, उत्तमपुरुसात

**दुस्सीलो (वि.) –** दुराचारी, दुस्सील

**एकाहं (नपु.) –** एका दिवसाचे

**सेय्यो (नपु.) –** श्रेष्ठ (अधिक)

**सब्बे (वि.) –** सर्व

**लभति (वर्त. क्रि. प. पु. ए. व.) –** प्राप्त करतो.

**अकरणं (क्रि.) –** न करणे

**उपसम्पदा (स्त्री.) –** संपादित करणे, प्राप्त करणे.

**एतं (सर्व.) –** हा, ही

**यत्थ (क्रि.वि.) –** जिथे कुठे

**देसना (स्त्री.) –** उपदेश

**नत्थि (क्रि.) –** नाही, नसणे

## स्वाध्याय

**१. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) प्रमाद न करणे कशाचे साधक आहे?

२) दुक्ख आपला पाठलाग कसे करते? उपमा द्या.

३) सुख आपले अनुसरण कसे करते? उपमा द्या.

४) चित्त कसे आहे?

५) मेधावी मनुष्य त्याला कसे सरळ करतो?

६) पुरिसाधमे म्हणजे काय?

७) पुरिसुत्तमे म्हणजे काय ?

८) सर्वच कशाला भितात?

**२. सत्य / असत्य सांगा.**

१) पमादो अमतपदं, अप्पमता मच्चुनो पदं ।

२) मनसा च पदुट्ठेन भासति वा करोति वा, ततो नं दुक्खमन्वेति चक्कं व वहतो पदं ।।

३) फन्दनं चपल चित्तं न दुरूक्ख दुन्निवारयं।

४) अत हि अत्तनो नाथो, को हि नाथो परोसिया ।

५) अत्तानं उपमं कत्वा हनेय्य घातये ।

**३. सूचनेनुसार कृती करा.**

**अ) संधी विग्रह करा.**

दुक्खमन्वेति, सुखमन्वेति, पुरिसुत्तमे

**आ) पूर्वकालवाचक क्रिया करा.**

कर, मर

**इ) विभक्ती ओळखा.**

मनो, दण्डस्स

**ई) खालील गाथा पूर्ण करा.**

अ) न तं माता .....................।
........................ नं ततो करे ।।


ब) अत्त हि अत्तनो नाथो ................।
................. लभति दुल्लभं ।।

क) चन्दनं तगरं वापि,..................।
एतेसं गन्धजातानं .................।।

ड) ..........., इति बालो विहञ्ञति ।
अत्ता हि अत्तनो नत्थि, ............।।

४. **खालील पालि गाथांच्या आधारे रेखाजाळे पूर्ण करा.**

''नत्थि रागसमो अग्गि, नत्थि दोससमो गहो।
नत्थि मोहसमं जालं, नत्थि तण्हासमा नदि।




५. **जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) नत्थि रागसमो | १) जालं |
| २) नत्थि दोससमो | २) अग्गि |
| ३) नत्थि मोहसमं | ३) नदि |
| ४) नत्थि तण्हासमा | ४) मल |
| | ५) गहो |

६. **पालि समानार्थी शब्द लिहा.**

अ) अमतपदं
आ) मेधावी
इ) पुत्तो

७. **खालील पालि शब्दांचे पालिमध्ये विरुद्धार्थी शब्द लिहा.**

अ) पमादो
आ) मेधावी
इ) पुरिसाधमे

☆☆☆